कला अकादमी गोवा
पणजी-गोवा
कअ/कविवि/शोकसंदेश/२०२४-२५/२५५२
दि.१३/०२/२०२५

# कृपया प्रसिध्दीसाठी

प्रख्यात गायक गोमंतकीय सुपुत्र पं. प्रभाकर कारेकर यांच्या निधनाबद्‌दल गोवा राज्याचे कला व संस्कृती मंत्री तसेच कला अकादमीचे अध्यक्ष गोविंद गावडे यांनी शोक प्रकट केला आहे. पं. कारेकर यांनी आपले संपूर्ण जीवन संगीत कलेला वेचले होते. संगीत क्षेत्रात अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार व मान सन्मान प्राप्त करुन त्यांनी गोमंतक भूमीलाही संगीताच्या क्षेत्रात प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली होती. त्यांच्या समकालीन कलाकारांमध्ये पं. कारेकर यांनी राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक प्राप्त केले होते. त्यांच्या जाण्याने एका जेष्ठ अनुभवी व बुजुर्ग कलाकाराला आपण मुकलो असल्याचे श्री. गोविंद गावडे यांनी आपल्या शोक संदेशात पुढे म्हटले आहे.

(श्री. प्रदीप गांवकर)
कार्यक्रम व विकास अधिकारी

प्रति
१.गोमंतक २.नवप्रभा ३.तरुण भारत ४.पुढारी ५.लोकमत ६.दै.हेराल्ड ७.गोवन वार्ता, ८. दै भांगरभूं ९.आकाशवाणी पणजी केंद्र( वृत्तविभाग)